**वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीची गुरूवार दिनांक 22.03.2018 रोजी दुपारी 2.00 वाजता मा.सभापती वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती यांच्या कक्षात भरलेल्या आढावा सभेचा अहवाल.**

सभेत मा.सभापती श्री.मनोज चापले यांचे सह मा.उपसभापती श्री.विजय चुटेले, मा.सदस्य श्री. लखन येरवार, मा.सदस्य श्री.दिनेश यादव मा.सदस्या श्रीमती वंदना चांदेकर, मा.सदस्या विशाखा बांते, मा.सदस्या श्रीमती गार्गि चोपरा तसेच विभागाकडून अति.उपायुक्त श्री.दांडेगावकर, आरोग्य अधिकारी(एम) डॉ.चिव्हाणे, मलेरिया फायलेरिया अधिकारी, पशुचिकित्सक अधिकारी, कारखाना विभाग, सर्व झोनचे झोनल अधिकारी आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

विषय क्र. 1:– दि.06.02.2018 रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्ताला कायम करण्यात आले.

विषय क्र. 2:– आरोग्य विभागाच्या(स्वच्छता) कामकाजाबाबत चर्चा करतांना अति.उपायुक्त श्री. दांडेगावकर यांनी नागपूर शहराकरिता रस्त्यांच्या स्वच्छतेच्या संदर्भात आखण्यात आलेले बीट, डोअर टू डोअर कच–याचे संकलन आणि उचल त्या अनुषंगाने कनक रिसोर्सेस प्रा.लिमिटेडला दिलेला कंत्राट, सुपर हायजिन कंपनीकडून बायोमेडीकल वेस्टची लावण्यात येणारी विल्हेवाट, शहरातील सार्वजनिक शौचालय धुण्याकरिता ब्रीक्स् कंपनीला देण्यात आलेला कंत्राट, कच–याची उचल करून भांडेवाडी येथे हेंजर कंपनीमार्फत कच–यावर करण्यात येणारी प्रक्रिया याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच शासनाकडून राबविण्यात येणारे प्रकल्प, वेस्ट टू एनर्जी तसेच कारखाना विभागामार्फत खरेदी करण्यात आलेल्या हातगाडया, जेसीपी, टिप्पर, पोकलॅन्ड आणि इतर मशिनरीची खरेदी याविषयी माहिती देण्यात आली.

विषय क्र. 3:–म.न.पा. दवाखान्याच्या कामकाजाबाबत चर्चा करतांना डॉ. चिव्हाणे यांनी नागपूर महानगरपालिकेचे दवाखाने, डिस्पेंसरी, एनयुएचएम अंतर्गत उभारण्यात आलेले हेल्थ सेंटर आणि होऊ घातलेल्या अद्ययावत प्रकल्पांची विस्तृत माहिती दिली.

देवडिया नर्सिंग होम अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त होणार असून नागपूरातील सर्वोत्कृष्ट रूग्णालयापैकी एक असेल सदर प्रकल्पाला लवकरच तांत्रिक मंजूरी मिळणार आहे. या नर्सिंग होम मध्ये नार्मल प्रसुती मोफत तर सिझर प्रसुती केवळ एक रूपयात करण्यात येईल. या रूग्णालयात प्रसुती करणा–या मातांना शासनाच्या योजनेतून 600 रूपये सुध्दा देण्यात येणार आहे. देवाडियाच्याच धर्तीवर मिनीमाता नगर येथे 30 खाटांचे अत्याधुनिक रूग्णालय होईल सध्या एनयुएचएम अंतर्गत मनपाच्या माध्यमातून 26 दवाखाने संचालित केले जातात त्यात सुध्दा वाढ करण्यात येईल असे डॉ. चिव्हाणे मार्फत सांगण्यात आले.

मृतदेहाला अग्नी दिल्यानंतर स्मशानातून धूर निघतो. पुण्याच्या धर्तीवर नागपूरातही मोक्षधाम घाटावर प्रदुषणमुक्त प्रकल्प उभारण्यात यावा याकरिता हा प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी आरोग्य समितीचे सभापती श्री.चापले, धंतोली झोनचे सभापती श्री. प्रमोद चिखले, अतिरिक्त उपायुक्त श्री. दांडेगावकर यांच्या नेतृत्वात पुणे येथे भेट दिली. या भेटीत त्यांनी प्रकल्पांचा संपुर्ण अभ्यास केला.

चितेवरून निघणा–या धुराला एका विशिष्ट प्रकारे बाहेर काढण्यात येवून तो एका चेंबरमध्ये जमा करण्यात येतो जेथे पाणी सोडले जावून ज्यामुळे प्रदुषणाची मात्रा कमी करण्यात येते त्यानंतर हा धूर एका चिमणीद्वारे 100 फुट उंच धूर सोडण्यात येतो अशा प्रकारची माहिती मा.सभापती श्री.चाफले यांनी दिली आणि अशा प्रकारचा प्रकल्प मोक्षधाम घाटासाठी करण्यासाठी प्रस्तावित केले असून याकरिता ना हरकत प्रमाणपत्राची प्रकिया सुरू आहे असेही त्यांनी सांगितले.

शहरात मोकाट कुत्र्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांच्या तकारीच्या अनुषंगाने मा. सभापती यांनी संबंधित पशुचिकित्सक अधिकारी श्री.महल्ले यांना विचारणा केली असता त्यांनी माहिती देतांना सांगितले कि, शासन निर्णयाप्रमाणे आता मोकाट कुत्र्याला मारता येत नाही. त्याचे नसबंदी करण्याचे आदेश आहेत त्यामुळे मोकाट कुत्र्यांची नसबंदी करण्यासाठी खाजगी एजन्सीला काम देण्याचे ठरले होते मात्र आता महानगरपालिकेद्वारे काम करणार आहे. यासाठी तीन पशुचिकित्सकाची नियुक्ती करण्यात आली आहे असेही त्यांनी सांगितले.

त्यानंतर मलेरिया व फायलेरिया अधिकारी यांनी किटकजन्य रोगांवर, मलेरिया, डेंगू या रोगांवर निर्मुलनासाठी विभागामार्फत चालणा–या कार्यक्रमाविषयी माहिती दिली.

शेवटी मा.सभापती यांनी नाला सफाईच्या संदर्भात मागच्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने झोनल अधिका–यामार्फत 10 झोनचा आढावा घेतला आणि निर्देशित केले की लवकरात लवकर नाला सफाईला जोमाने सुरूवात करण्यात यावी. यात काही अडचणी असल्यास समितीला किंवा संबंधित अधिका–यांसमोर अडचणी ठेवून ज्या काही उपाययोजना कराव्या लागतील त्या करून अडचणीचे निराकरण करण्यात यावे. प्रभाग क. 4 मध्ये सफाईच्या संदर्भात विषय ठेवण्यात आला होता त्या अनुषंगाने संबंधित अधिका–यामार्फत या प्रभागाचा दौरा करण्यात यावा असे निर्देशित करण्यात आले होते परंतु अद्यापही दौरा करण्यात आलेला नाही त्याविषयी संबंधितांनी लक्ष घालावे. मा.उपसभापती श्री.चुटेले यांनी सुचित केल्याप्रमाणे त्यांच्या प्रभागातून 4–4 दिवस कच–याची उचल होत नाही तसेच प्रभाग क. 17 मध्ये सकाळी दारू पिऊन कर्मचारी कचरा उचलण्यास येतो. त्या अनुषंगाने सॅनेटरी इन्स्पेक्टर यांना स्पष्ट निर्देश आहेत की त्यांनी मा.सदस्यांशी समन्वय साधून कार्ये करावेत आणि दारू पिऊन येणा–या कर्मचा–यांविषयी प्रभागातील सुपरवायजर यांना कडक निर्देश द्यावेत. त्या कर्मचा–याची त्या दिवशीची अनुपस्थिती दाखविण्यात यावी असेही मा.सभापती यांनी सुचित करून सभा समाप्तीची घोषणा केली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती